## -: प्रेसनोट दिनांक- २६/०३/२०१९ :-

**(१) गणेश विठ्ठल लिगाडे, वसुली निरीक्षक, बाह्य सेवा कर्मचारी, महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ मर्या.(मुंबई),जिल्हा कार्यालय,कोल्हापूर यांनी तक्रारदार यांचेकडे २,०००/- रुपये लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम स्विकारलेने त्यांना रंगेहात पकडलेबाबत व (२) अनिल बाळासो पाटील, वसुली निरीक्षक, बाह्य सेवा कर्मचारी, महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ मर्या.(मुंबई),जिल्हा कार्यालय,कोल्हापूर यांनी २,०००/- लाच मागितलेबाबत......**

---

मुळ तक्रारदार त्यांचा मतिमंद भाऊ श्री.सुजित शामराव सुतार यांचेसह एकत्रित राहाणेस आहेत. ते फुलेवाडी येथे टायर सर्व्हिस दुकान चालवित आहे. मतिमंद व्यक्तींचे विकासासाठी महाराष्ट्र शासनाचे महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ यांचेमार्फत कर्ज पुरवठा करणेची योजना राबविली जाते. तक्रारदार यांनी त्यांचा मतिमंद भाऊ सुजित सुतार याचेसाठी त्या योजनेचा लाभ घेण्याकरीता भावाचे नावे जिल्हा व्यवस्थापक,महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ कोल्हापूर यांचेकडे सन २०१६ मध्ये टायर सर्व्हीस दुकानासाठी रु.२,५०,०००/- कर्ज मंजूर होणेबाबत अर्ज सादर केला होता. त्यानुसार व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य अपंग वित्त आणि विकास महामंडळ मर्या.मुंबई यांचेकडून दि.१७/१२/२०१६ रोजी भाऊ सुजित सुतार याचे नावे टायर सर्व्हीस व्यवसायासाठी रु.१,५०,०००/- इतके कर्ज मंजूर झालेचे पत्र प्राप्त झाले. त्यामध्ये रा.वि.वि.एवम वि.महामंडळाचा हिस्सा रु.१,३५,०००/-, म.रा.अ.वि.वि.म.चा हिस्सा रु.७,५००/- अर्जदाराचा हिस्सा रु.७,५००/- असलेचे कळविणेत आले. तसेच कर्जासाठी जिल्हा व्यवस्थापक, वित्त आणि विकास महामंडळ, कोल्हापूर कार्यालयामार्फत प्रॉपर्टी गहाणखत करावे लागेल असे कळविले. त्यानुसार तक्रारदार यांनी त्यांचे नावे असलेला २८५ चौ.मी क्षेत्रच्या प्लॉटचे गहाणखत दुय्यम निबंधक, करवीर येथे करुन दिले. त्यानंतर महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ मर्या.जिल्हा कार्यालय,कोल्हापूर यांचेमार्फत तक्ररदार यांनी गहाण खत केलेल्या प्लॉटचे ७/१२ पत्रकी कर्ज बोजा नोंद चढविणेत आला. त्यानंतर दि.१०/०८/२०१८ रोजी महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ मर्या.(मुंबई) यांचेवतीने प्राप्त झालेला रु.७५,०००/- रक्कमेचा पहीला चेक महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ मर्या.जिल्हा कार्यालय,कोल्हापूर यांचे कार्यालयामार्फत तक्रारदार यांना मिळाला. .

- त्यानंतर तक्रारदार यांचा भाऊ सुजित याचे नावे मंजुर झालेल्या रु.१,५०,०००/- कर्ज रक्कमेपैकी उर्वरित रु.७५,०००/- मिळणेसाठी त्यांनी वारंवार महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ मर्या.जिल्हा कार्यालय,कोल्हापूर यांचे कार्यालयात जावून तेथील लिपिक अनिल पाटील, लिगाडे यांना भेटले. परंतू त्यांनी चेक काढला नाही. त्यानंतर पुन्हा गेल्या १५ दिवसापुर्वी तक्रारदार महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ मर्या.जिल्हा कार्यालय,कोल्हापूर यांचे कार्यालयात क्लार्क अनिल पाटील यांना भेटून त्यांना चेक काढणेसाठी विनंती केली असता, त्यांनी चेक काढणेसाठी रु.५,०००/- रक्कमेची मागणी केली. तसेच रु.७५,०००/-चा दुसरा चेक काढल्यानंतर लिपीक अनिल पाटील व लिगाडे यांनी त्यांचे मोटर सायकलच्या टायर नविन घालून द्याव्या लागतील असेही सांगितले होते. त्याबाबत तक्रारदार यांनी दिनांक १५/०३/२०१९ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे लिपीक अनिल पाटील यांच्याविरुध्द तक्रार दिली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे दिनांक १५/०३/२०१९ रोजी महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ मर्या.जिल्हा कार्यालय, कोल्हापूर या ठिकाणी शासकीय पंच साक्षीदारांचे समक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, पडताळणीमध्ये तक्रारदार यांचेकडे लिपीक लिगाडे यांनी तडजोडीअंती रु.२,०००/- तसेच लिपीक अनिल पाटील यांनी देखील रु.२,०००/- लाच रक्कमेची मागणी केली होती.

आज रोजी तक्रारदार यांनी महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ मर्या.जिल्हा कार्यालय, कोल्हापूर येथे जावून लिपीक लिगाडे व अनिल पाटील यांची भेट घेतली असता, त्यांनी जिल्हा व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ मर्या.जिल्हा कार्यालय,कोल्हापूर व सहा. लेखाधिकारी यांचेमार्फत रु.७५,०००/- रक्कमेचा उर्वरित चेक काढला व तो चेक देणेसाठी वसुली निरीक्षक लिगाडे यांनी तक्रारदार यांचे कडून रु.२,०००/- लाच रक्कम महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ मर्या.जिल्हा कार्यालय, कोल्हापूर येथे स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडणेत आले आहे. सदर प्रकरणी वसुली निरीक्षक गणेश लिगाडे व अनिल

पाटील यांना ताब्यात घेणेत आले असून त्यांचेविरुध्द शाहुपूरी पोलीस ठाणे, कोल्हापूर येथे गुन्हा नोंद करणेची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई श्री. संदीप दिवाण, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे व श्री.दिलीप बोरस्ते, अपर पोलीस उपआयुक्त/अपर पोलीस अधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार श्री.गिरीश गोडे, पोलीस उपअधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर, पोलीस हवालदार मनोज खोत, पोलीस नाईक नवनाथ कदम, पोलीस कॉन्स्टेबल मयुर देसाई, चालक पोहेकॉ. विष्णु गुरव, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तकारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

**१)मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१**

**२)मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.**

**३)श्री.गिरीश गोडे , पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ८१०८६६०७०७, कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.**

**४)हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४. ५)व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.**